भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १०४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०२/२०१७

**१) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एकाचा मृत्यु . :–**

दिनांक १२/०२/२०१७ चे १९.१५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी अशोक पंढरी घुबडे वय ४४ वर्ष, रा. पाटबंधारे कॉलोनी नीन बस स्टॉप साकोली याचा मृतक मुलगा अनीकेत घुबडे वय १५ वर्ष, हा मोटार सायकल क्र. एमएच ३६ टी ७७०४ ने साकोली बाजारात एनएच ०६ रोड नी येत असतांना देवरी कडुन साकोली कडे येणाऱ्या यातील अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मुलाचे ताब्यातील मोटार सायकल ला धडक देऊन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची खबर न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादंवी. सहकलम १८४,१३४(अ)(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. वानखेडे हे करीत आहेत.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई:–**

दिनांक ११/०२/२०१७ चे २३.३० ते २३.५५ वा. दरम्यान यातील आरोपी याने दारु पिवुन दारुचे नशेत आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. आर. ज. ०९ एस के ६२४१ चा चालक ही सार्वजनीक रोडवर वेडीवाकळी चालवीतांना मिळुन आल्याने आरोपीला सु. बो. दवाखाना तुमसर येथे नेऊन डॉ. ने दारु पिल्या बाबतचा अभिप्राय दिल्या वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास परीपोउपनी. सोनपीपरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) अंधाऱ्या रात्री दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

अ) दिनांक १२/०२/२०१७ चे ००.१५ ते ००.४५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी सरतर्फे फिर्यादी पोना गुरव हे स्टॉप सह रात्र गस्त व गुन्हेगार चेक डयुटी करीत असतांनी यातील आरोपी हा आपले अस्तीत्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या इरादयाने अंधारात मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गुरव पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

ब) दिनांक ११/०२/२०१७ चे २३.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी हे पोलीस स्टॉप सोबत कोबींग पेट्रोलींग करीत असतांना सनफ्लॅग कंपनीचे मागील परीसरात अंधारात यातील आरोपी तोंडाला रुमाल बांधुन आपले अस्तीत्व लपवुन चोरी करण्याच्या उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १२२(ब) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) गर्भवती महीलेचा औषधोपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिंनाक १०/०२/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील मृतक सौ. विपुल रामरतन ओझा वय २५ वर्ष, गोसे कालोनी हीचे सन २०१३ मध्ये लग्न झाले असुन ति दुसऱ्यांदा ८ महीण्याची गर्भवती असतांनी तिला अचानक चक्कर येऊन रुम मध्ये पडल्याने तिची अचानक प्रकृती खराब झाल्याने तिला ग्रा. रु. पवनी येथे औषधोपचारा कामी आणले प्रथम उपचार करुन पुढील उपचारा करीता सा. रु. भंडारा येथे रेफर केल्याने तिला सा. रु. भंडारा येथे आकस्मीत विभागात आणले तेथील डॉ. नी चेक केले असता मरण पावल्याचे घोषीत केल्याने डॉ. रिपोर्ट वरुन पो.स्टे. ला प्राप्त १७४ जाफौ. चे कागदपत्र पो. स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. कनपुर्या पो. स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे १७४ कलम जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो. स्टे. पवनी हे करीत आहे.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-

दिनांक १२/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ९१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.